<u>भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र</u>

जा.क्र. ३६८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/०७/२०१८

**१) सोन्या–चांदीचे दागीन्याँची चोरी : –**

**अ)** दिनांक १९+ २०/०७/२०१८ चे १८.०० रात्र दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फिर्यादीचे घराचे मागील दरवाज्याचा कोंडा तोडुन आत प्रवेश करून स्टोर रूममधील ठेवलेल्या लाकडी पेटी मधील ४ ग्रॅम सोन्याचे मंगळसुत्र, चांदीचा तोरडया २ जोड, चांदीची आंगठी १ तोडा, सोन्याची जिवती १ ग्रॅम असा एकुण १८,८००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी अशोक रामा रंधये वय ४५ वर्ष रा. धर्मापुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**ब)** दिनांक १९+ २०/०७/२०१८ चे १८.०० रात्र दरम्यान यातील फिर्यादीचे घराचे मागील दरवाज्याचा कोणीतरी अज्ञात आरोपीने कोंडा तोडुन आत प्रवेश करून घरातील लोखंडी टिनाच्या पेटीतील लोखंडी टिनाचा पेटीत ठेवलेले सोन्याचे पदक ४ ग्रॅम, सोन्याचे कारले मनी १ ग्रॅम, सोन्याच्या जुन्या कुडया ३ ग्रॅम असा एकुण १६,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी बाबुराव दामाजी बोरकर वय ५७ वर्ष रा. धर्मापुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम ४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. बागडे पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) घरातील साहित्याची चोरी : –**

दिनांक ०३/०७/२०१८ ते १९./०७/ २.१८ चे १४.३० दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादीचे मालक सुनील अग्रवाल रा. गोंदिया यांचे राहते घराचे दि. ०३/०७/२०१८ ते दि. १९/०७/२०१८ चे १४.३० वाजता दरम्यान ताले तोडुन आत प्रवेश करून घरात ठेवलेले पितळी गंज, पितळी पंप, २ एचपी कंपनीचे रिकामे सिलेंडर घरघुती वहीवाटीचे सामान, ए.सी. असा एकुण ३५,०००/रु. चा माल चोरून नेल्याने फिर्यादी निरज लालाजी बनकर वय ४३ वर्ष रा. महात्मा गांधीवार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चोथकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) अवैधरित्या जनावरांना त्रास होईल अशा रितीने डांबुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०७/२०१८ चे ७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हे पोलीस स्टॉपसह पोलीस गाडीने भंडारा ते खरबी पर्यत एनएच ६ रोडने पेट्रोलिंग करीत असतांना यातील आरोपी चालकाने त्याची ताब्यातील पिकअप गाडी क्र. एमएच ४० पि.जी. ०६६८ किमती २,००,०००/रु. त्यामध्ये ६ नग जनावरे काळे– पांढरे किमती १,२०,०००/रु. असा एकुण ३,२०,०००/रु. चा माल गाडीच्या अपु–या जागेत डांबुन जनावरांना त्रास होईल अशा रितीने अवैधरित्याा वाहतुक करतांना मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सपोनी. पोटे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ११(१)(घ)(ड) प्राणी निर्दयतेने वागविण्याचा कायदा. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) विवाहीतेला शारीरीक व मानसीक त्रास देवुन हुंडयाची मागणी केल्याने गुन्हा नोंदः –**

दिनांक २१/०३/०१८ ते दि. २०/७/२०१८ पर्यंत यातील आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीला लग्न झाले तेव्हा पासुन शारीरीक व मानसीक त्रास देवुन माहेरून आई–वडीलांकडुन 'पैसे घेवुन ये नाहीतर घरून निघुन जा' असे म्हणतात, अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४९८(अ),३४ भादवी. सहकलम ४,५ हुंडाबळी अधीनीयम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा गोंडाणे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) डॉक्टरचे प्रमाणपत्र नसतांना वैदयकीय व्यवसाय करून ॲलोपॅथीक औषाधाचा वापर करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंदः –**

दिनांक २०/०७/०१८ चे १२.३० यातील फिर्यादी आरोग्य अधीकारी यांनी २ पंच व स्थागुशा. स्कॉडसह साहायक आयुक्त (औषधे) अन्न व औषध प्रशासन भंडारा यांचे पत्रावरून नागमाता दवाखाना येथे धाड घातली असता, आरोपी हा बोगस डॉक्टर असुन कोणत्याही प्रकारचे डॉक्टरचे प्रमाणपत्र नसतांना वैदयकीय व्यवसाय करून ॲलोपेथीक औषधाचा वापर करतांना मिळुन आल्याने फिर्यादी डॉ. मिलींद प्रल्हाद मोटघरे वय ५१ वर्ष रा. आरोग्य अधीकारी पंचायत समीती भंडारा यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३३,३६ महाराष्ट्र वैयकीय व्यवसायी अधीनीयम. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चौथनकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) मोटार सायकलच्या धडकेत एक जखमी : –

दिनांक २०/०७/०१८ चे ११.३० यातील फिर्यादी हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३६ व्ही. २४३१ ने भंडारा येथे येत असतांना विरूध्द दिशेने येणारे यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने व निष्काळजीपणे चालवुन विरूध्द दिशेने येवुन फिर्यादीचे मोटार सायकलला एनएच ०६ रोड बिटीबीमा मार्केट समोर नवीन रोड २ किमी पुर्व येथे धडक देवुन फिर्यादीस, फिर्यादीचा भाऊ राहुल कोठुजी चाचेरे याला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी मंगेश कोल्हुजी चाचेरे वय ३३ वर्ष रा. कारधा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

७) रेनॉल्ड क्वीड वाहन चालक हा स्वत: व इतर इसमांना जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद: –

दिनांक २०/०७/०१८ चे १६.०० यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन लापरवाहीने व निष्काळजीपणे चालवुन समोरून येणा–या इनोव्हा गाडी क्र. एमएच ४९ बी.ए. ५७७७ ला निष्टी येथे धडक मारून त्यामधील इसमांना व स्वत: जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी सरद मधुकर भोजापुरे वय २७ वर्ष रा. निष्टी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. जाधव पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

८) अनोळखी वाहनाच्या धडकेत एक जखमी: –

दिनांक २०/०७/०१८ चे ११.३० यातील जखमी फिर्यादी हा त्याचे सायकलने सिंगोरी वरून आंबाडी येथे एनएच ६ रोडने येत असता, मागेहुन येणा–या अनोळखी चारचाकी बोलेरो पिकअप माल वाहक वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळीपणे चालविल्याने मागेहुन धडक दिल्याने, फिर्यादी खाली पडून किरकोळ दुखापत झाली व वाहन चालक वाहन सोडुन पडुन गेल्याने फिर्यादी संजय गजानन मल्लेवार वय ३५ वर्ष रा. आंबाडी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४/१३४/१७८ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नान्हे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

९) संगनमत करून वन विभागाचे झाडे उपडुन फेकुन नुकसान केल्यान केल्याने गुन्हा नोंद–

दिनांक २०/०७/०१८ चे १३.१५ यातील आरोपीतांनी संगनमत करून वन विभागाचे संरक्षित वन गट क्र. २८६ चे जागेत प्रवेश करून आरोपी क्र. १ ने त्याचे मालकीचे ट्रॅक्टर क. एमएच ४० एल ६४९८ नी नागरनी करून झाडे लावण्याचे गड्डे बुजवीले व सदर जमीनीत लावेले झाडे आरोपी क. २ ने उपडुन फेकुन वनविभागाचे ६,५००/रु. चे नुकसान केल्याने फिर्यादी मनोहर हरी कोटेवाड वय २७ वर्ष रा. आंबाडी यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४७,४२७,३४ भादवी. सहकलम ३३,(क) भारतीय वन अधीनीयम १९२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

१०) महिलेचा विनयभंग करून जिवे मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद : –

दिनांक २०/०७/०१८ चे १६.०० यातील फिर्यादी ही तिचे लहान मुला सोबत हजर असतांना यातील आरोपी ही छतावरून घरात प्रवेश करून फिर्यादीचे हात पकडुन केस धरून थापड बुक्यानी मारपीट करून जिवाने मारण्याची धमकी देवुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५२,३५४,३२३,५०६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत

११) तलावाचे पाण्यात बुडुन ईसामाचा मृत्यु : –

दिनांक २०/०७/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक गिरीधर राजाराम मेश्राम वय ७० वर्ष रा. शुक्रवारी वार्ड पवनी हा दारूचे नशेत बाल समुद्र तलावा जवळ त्याचा पाय घसरून तलावाचे पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी संजय गिरीधर मेश्राम वय ४६ वर्ष रा. शुक्रवारी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

१२) ईसमाचा मृत्यु : –

दिनांक २०/०७/२०१८ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक सुभाष विनायक मने वय ४० वर्ष रा. धोप हा गाडी पन्चर दुरूस्ती करण्यासाठी धोप बसस्टॉप येथे गेला असता, अचान चक्कर आल्याने पडला त्यांनतर त्याचे नातेवाईक औषधोपचारा करीता प्राथमीक आरोग्य केंद्र आंधळगाव येथे आनुन तेथील डॉ. नी तपासुन मरण पावल्याचे घोषीत केल्याने फिर्यादी कैलास विनायक मने वय ३२ वर्ष रा. धोप यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. सोलंखी पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**१३) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

**अ)** दिनांक २०/०७/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी–पीवळी वाहन हे एनएच ०६ रोड साकोली येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. निंबार्ते यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. निंबार्ते पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**ब)** दिनांक २०/०७/२०१८ चे ११.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील काळी–पीवळी वाहन हे एनएच ०६ रोड साकोली येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. देवेंद्र खडसे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. देवेंद्र खडसे पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**१४) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २०/०७/२०१८ चे १२.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मिनीडोअर वाहन हे खामतलाव वार्ड भंडारा येथे सार्वजनिक रोडवर मधोमध उभा करुन येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना.साबळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गजभिये पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

**१५) अवैध हातभट्टी ,देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी अवैध हातभट्टी, देशी दारु /जुगार अडड्यांवर धाडी घालुन पोलीस स्टेशन जवाहरनगर,तुमसर, पवनी व अडयाळ, येथे अवैध हातभट्टी, देशी दारु अडयावर धाडी घालुन एकुण ०८ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ४२ लिटर हा.भ. दारू + १ डपकी कि ४,२५० /– रु. व ४८ लिटर ५६० मिलीलीटर देशी दारू किंमती १४,०३८/– रु. तसेच जुगारातुन किंमती २५,२८५/–रु. असा एकुण ४३,५७३ /–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१६) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २०/०७/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १४९ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवाशी– ०१ तीन सिटर वाहनाकरीता– ०७ ईतर वाहनांवरती – १४१ केसेस करण्यात आले आहे.

(पोउपनी.जे.के.आडोळे)
महीती कक्ष अधिकारी भंडारा
दुरध्वनी.क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आह

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.